रे. मु. नं. १२०२/२०२२
कमल चव्हाण **वि.** आरुण जाधव

## <u>निशाणी क्रमांक ११ खालील आदेश</u>

सदरचा अर्ज प्रतिवादी यांनी 'विना कैफियत' असा झालेला आदेश रद्द होवुन त्यांची कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन स्वीकारण्यात यावी यासाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी यांचे कथन असे की, प्रतिवादी हे जि.प.नंदीवळी वस्ती या शाळेत शिक्षक म्हणुन कार्यरत आहे. प्रतिवादी हे शाळेच्या कामात व्यस्त असल्याने व वैयक्तीक कामानिमित्त परगांवी गेल्याने वकीलांसोबत संपर्क साधु शकले नाहीत. प्रतिवादी यांच्याकडुन संपूर्ण माहिती न मिळाल्याने कैफियत मुदतीत दाखल करणे शक्य झाले नाही. सबब प्रतिवादीविरुध्द दिनांक १५.०४.२०२३ रोजी 'विना कैफियत' आदेश पारित करण्यात आले. सबब, प्रतिवादी विरुध्द झालेला 'विना कैफियत' आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवुन कैफियत स्विकारणेत यावी अशी विनंती प्रतिवादी यांनी केलेली आहे.

३. वादीने प्रस्तुत अर्जावर म्हणणे देवुन विरोध केला आहे. वादीचे म्हणणे की प्रतिवादी हे दिनांक ०४.०२.२०२३ रोजी सदर प्रकरणामध्ये हजर झालेले आहेत. त्यानंतर प्रतिवादी व त्यांचे विधिज्ञ अभिलेखावर कोणताही अर्ज न देता गैरहजर राहिल्याने न्यायालयाने दि. १५.०४.२०२३ रोजी 'विना कैफियत' आदेश पारित केलेला आहे. माहे मार्च महिन्यापासुन सर्व शाळा, महाविद्यालय यांना सुट्टी चालु होतात. त्यामुळे प्रतिवादी यांचेवर कोणताही कामाचा ताण नव्हता. तसेच सदर आदेश पारित होवुन देखिल दोन महिन्यानंतर हल्लीचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी केलेला विलंब प्रतिवादी यांची निष्काळजी म्हणता येईल. सबब अर्ज नामंजूर करावा.

४.	दोन्ही पक्षाचे कथन विचारात घेता, खालील मुद्दे उपस्थित होतात, त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | प्रतिवादीचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे का? | होय |
| ०२. | कोणता आदेश? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ व २**

५.	प्रस्तुतचा दावा हा रक्कम वसुल होवुन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. सबब, दाव्यातील पक्षकार व त्यांचे म्हणणे विचारात घेवून त्यांच्यातील वाद मिटवून निकाली काढणे जरुरीचे आहे. या प्रकारचे अर्ज निकाली काढताना उदारमतवादी विचार करणे गरजेचे आहे. न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादीना संधी देवून त्यांना कैफियत दाखल करणेस परवानगी देणे योग्य वाटते. जरी प्रतिवादीचा अर्ज मंजूर होण्यास पात्र असला तरी, त्यांनी केलेल्या विलंबाबाबत त्यांचेवर खर्च लादणे न्याय्य व रास्त आहे. वर नमुद विवेचनाअंती मुद्दा क्रमांक १ चा ''होकारार्थी'' निष्कर्ष नोंदविण्यात येतो. मुद्दा क्रमांक २ करीता खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज (निशाणी क्र.११) मंजूर करण्यात येत आहे.
२. प्रतिवादी विरुध्द दि. १५.०४.२०२३ रोजी झालेला 'विना कैफियत' आदेश हा रद्द करण्यात येतो.
३. प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब रक्कम रुपये ५००/- (अक्षरी रुपये पाचशे फक्त) खर्च जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर यांना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.
४. प्रतिवादी यांची कैफियत उपरोक्त अटीस अधिन राहुन स्वीकारण्यात येते.

ठिकाण – सोलापूर.
दिनांक – ०१/१२/२०२३.

(एस.ए.आर.सैय्यद)
५वे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
सोलापूर.

## <u>CERTIFICATE</u>

I affirm that the contents of this PDF file are same word to word as per the original.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Suresh M. Malkapalli |
| (b) | Court | : | 5$^{th}$ Jt. Civil Judge (S.D.), Solapur. |
| (c) | Signed by P.O. On | : | 01.12.2023 |
| (d) | Uploaded on | : | 11.12.2023 |